नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०६/०३/२०२५ (गुरूवार)

---

## नागपुर ग्रामीण जिल्हयात अवैध अंमली पदार्थ (एन.डी.पी.स)कायदयाअंतर्गत कारवाई करण्यासाठी तयार करण्यात आले स्वतंत्र विशेष पथक

मा. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रमीण जिल्हा यांनी नागपुर ग्रामीण जिल्यात अवैध अंमली पदार्थाचा साठा, विक्री ,किंवा वाहतुक करणारे आरोपीतांवर कारवाई करणे कामी स्थानिक गुहे शाखेचे अधिकारी आणि अंमलदार यांचे स्वतंत्र विशेष पथक तयार करण्याचे आदेश पारीत केले आहे. सदर पथक नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत विशेष मोहीम राबवुन गोपनिय सुत्रांकडुन अवैध अंमली पदार्थाचा साठा विक्री किंवा वाहतुक करणाऱ्याबाबत माहीती काढुन असे अवैध व्यवसाय करणाऱ्या विरूध्द प्रभावी कार्यवाही करतील.सदर विशेष कार्यवाही **साठी स्थानिक गुन्हे शाखेचे १ अधिकारी ५ अंमलदार यांचे पथक स्थापन करण्यात आले आहे.**

## मा.पोलीस अधिक्षक ,नागपुर ग्रामीण जिल्हा यांची अवैध धंदयावर करडी नजर अवैध धंदयावर कारवाई न करणाऱ्या बीट अधिकारी/अंमलदार यांची करण्यात बदली

मा. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रमीण जिल्हा यांची अवैध धंदयावर करडी नज असुन त्यांनी वेळोवेळी अवैध धंदयावर कारवाई करणे कामी विशेष पथकांची नेमणुक करून पोलीस स्टेशन हद्दीत अवैध धंदयावर कारवाई केल्या आहे. पोलीस स्टेशन अंतर्गत बीट मध्ये नेमलेल्या अधिकारी आणि अंमलदार यांनी आपल्या हद्दीत चालणाऱ्या अवैध धंदयाकडे दुलर्क्ष करून कारवाई केली नाही किंवा ज्या बीट मध्ये मा. पोलीस अधिक्षकांनी नेमलेले विशेष पथक, स्थानिक गुन्हे शाखा पथक किंवा इतर विभागाकडुन

अवैध रेती वाहतुक ,जुगार ,अवैध दारू अशा २ पेक्षा जास्त कार्यवाही करण्यात आल्या आहे. **अशा कसुरी करणाऱ्या ६ अधिकारी आणि ७ अंमलदारांची सध्या नेमणुकीचे ठिकाणावरून बदली करण्यात आली आहे.**